# 'नॉर्थब्रिया' पदाधिकाऱ्यांची घोडावत इन्स्टिट्यूटला भेट

कोल्हापूर, ता. २ : संजय घोडावत इन्स्टिट्यूटला इंग्लंड येथील नॉर्थब्रिया युनिव्हर्सिटीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट दिली. दोन्ही इन्स्टिट्यूटमध्ये पदवी व पदव्युत्तर कोर्सेससाठी संलग्निता प्रस्थापित करण्याच्या शक्यता पडताळून पाहणे तसेच विविध कमी कालावधीचे कोर्स सुरू करणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता.

इंटरनॅशनल डेव्हलपमेंट अँड रिक्रूटमेंट व डेव्हिड वेल, जोसेफ एलेन, असोसिएट डीन इंटरनॅशनल मेकॅनिकल अँड कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग आर्दोंचा भेटीत समावेश होता. संस्थेचे विश्वस्त विनायक भोसले, शैक्षणिक सल्लागार डॉ. व्ही. ए. रायकर, प्रा. नीलेश सवनीस यांनी त्यांचे स्वागत केले. इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर जाण्याची संधी निर्माण करून देणे तसेच नॉर्थब्रिया युनिव्हर्सिटीमध्ये पदव्युत्तर तसेच संचालक कार्यक्रमासाठी मार्ग करून देण्याबद्दल सविस्तर चर्चा या वेळी झाली.

नॉर्थब्रिया युनिव्हर्सिटी ही सर्वप्रथम एक पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या स्वरुपात सुरू करण्यात आलेली व त्यानंतर तिचे विद्यापीठात रुपांतर झालेली एकमेव संस्था आहे. भेटीच्या नियोजनासाठी 'एज्युअलायन्स एज्युकेशनल कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड'चे कार्यकारी संचालक आनंद हांडुर यांनी विशेष पुढाकार घेतला.



**कोल्हापूर : संजय घोडावत इन्स्टिट्यूटला भेट देण्यासाठी आलेले नॉर्थब्रिया युनिव्हर्सिटीचे पदाधिकारी.**